# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**राज्यातील आश्रमशाळांमध्ये सोयीसुविधांच्या अभावापायी विद्यार्थ्यांचा मृत्यू होत असल्याबाबत**

**(१) (२२-११-२०१४). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळांमध्ये सोयीसुविधांच्या अभावापायी सर्पदंशाने किंवा विंचू दंशाने मृत्यू पावणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याने याला आळा घालण्यासाठी आश्रमशाळांना कोणत्या सुविधांची आवश्यकता आहे याची संपूर्ण माहिती मिळण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने शासनाला माहे जुलै-२०१४ च्या सुमारास आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशनुसार सदरील आश्रम शाळांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-११-२०१८)** :(१), (२) व (३) राज्यातील आश्रमशाळांमधील सोयीसुविधांबाबतच्या उपलब्धतेबाबतची टाटा इन्स्टीट्युट ऑफ सोशल सायन्सेस,मुंबई या त्रयस्त संस्थेकडून करण्याबाबतचे निर्देश मा.उच्च न्यायालय यांनी दिले होते.त्यास अनुसरुन विभागाने टाटा इन्स्टीट्युट ऑफ सोशल सायन्सेस,मुंबई यांच्या सदस्यांचा समावेश करून त्यांचे संनियंत्रणाखाली सामाजिक न्याय,महिला व बाल विकास व ग्रामविकास या विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश करून ऑगस्ट-२०१४ मध्ये सर्व आश्रमशाळांची तपासणी करण्यात आली.सदर तपासनी अहवालाचे विश्लेषण करत TISS ने ऑगस्ट ,२०१६ मध्ये शासनास अहवाल सादर केला.

त्यानुसार मुलभुत सुविधांच्या आधारे आश्रमशाळांचे अ,ब,क व ड असे वर्गीकरण करण्यात आले.त्यांच्या अहवालानुसार एकूण शाळांपैकी १६७ इतक्या शाळा क व ड वर्गात

होत्या.त्यामध्ये ६ महिन्यात सुधारणा करण्याची शिफारस होती.त्यानुसार आश्रमशाळांना नोटीस देऊन सुधारणा करण्याबाबत कळविले होते.विभागाच्या अधिका-यांनी सन २०१७ मध्ये केलेल्या तपासणीमध्ये बहुतांशी आवश्यक सुधारणा केल्याचे निदर्शनास आले आहे.

---

## मोखाडा तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळांना खाद्य व इतर सुविधा पुरवठा बंद असल्याबाबत.

**(२) २४४ (३०-११-०००२). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा तालुक्यातील आदिवासी मुलांच्या आश्रमशाळांना आदिवासी महिला बचत गटांद्वारे भाजीपाला, मटण, दुधपुरवठा तसेच इतर सुविधा पुरवठा करण्यात येतो मात्र त्यांना माल पुरवठयाचे बिल प्रकल्प कार्यालयाने मागील काही महिन्यापासून देण्यात आले नसल्याने त्यांना माल पुरवठा बंद करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी महिला बचत गटांनी आदिवासी आश्रमशाळेत पुरविण्यात आलेल्या मालाची देयके त्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-११-२०१८) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्हयातील नरडाणा औद्योगिक वसाहतीतील भूखंड वाटपात अनियमितता झाल्याबाबत

**(३) ६०२९७ (२२-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील नरडाणा औद्योगिक वसाहतीतील भूखंड वाटपात अनियमितता झाल्याबाबतची तक्रार लघुउद्योग भारतीच्या शाखेने केल्याचे नुकतेच माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीनुसार भूखंड वाटपातील अनियमितेसंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी व्यक्तींवर शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नरडाणा औद्योगिक क्षेत्रातील अर्जातील नमूद भूखंडाचे वाटप हे स्थानिक भूखंड वाटप समिती व मुख्यालयीन भूखंड समितीच्या निर्णयानुसार भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे भूखंड वाटपात अनियमितता होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव एमआयडीसीने शेतकऱ्यांच्या इच्छेविरुध्द जमीन संपादीत केल्याबाबत**

**(४) ६१०८९ (२२-०८-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव एमआयडीसीने सध्या ४० कोटी रुपये बाजारमुल्य असलेला २ हेक्टर २३ आर भुखंड प्लॉट नंबर पी-१०६ व प्लॉट नंबर पी-१०७ असे भाग करुन दोघाना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमीन संपादीत करणे एमआरयडीसीच्या हाती नसल्याने महसूल विभागाच्या मदतीने नियम बाह्य,कुठलेही निकष न पाळता शेतकऱ्यांच्या इच्छेविरुध्द जमीन संपादीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमीनीवर जमीनमालक स्वत: उद्योग सुरु करणार असल्याने तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी सन १९८३ मध्ये तर न्यायालयाने १९९८ मध्ये एमआयडीसीला जमीनीचा ताबा घेऊ नये असे आदेश दिलेले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
सदर मौजे मेहरूण ता. जि. जळगाव येथील गट नं. १०७/१+२ अ, मधून महामंडळाने भूखंड क्र. पी १०६, क्षेत्र ८००० चौ. मी. भूखंड क्र. पी १०७ क्षेत्र ६३०० चौ. मी. व भूखंड क्र. पी १०८ क्षेत्र ५९० चौ. मी. असे भूखंडाचे आरेखन करून सन २०१५ साली उद्योजकांना महामंडळाच्या तत्कालीन व्यापारी दराने (रू. १३३०/-प्रती चौ. मी ) प्रमाणे वाटप केले आहे. त्यानुसार सदर तीन्ही भूखंडाचे एकूण मूल्य रू. १,९८,०३,७००/- इतके होते.

सदरहू औद्योगिक क्षेत्रात व्यापारी भूखंडाचे दर रू. ३४००/-प्रती चौरस मिटर आहे. त्यानुसार उपरोक्त तिन्ही भूखंडाचे एकूण मूल्य रू. ५,०६,२६,०००/- इतके आहे.
(२) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, जळगाव यांचे मार्फत सदर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार संपादित करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) सदर जमीनीच्या मालकाने भूसंपादन न करण्याबाबत निवेदन दिल्यामुळे त्यावर तत्कालीन जिल्हाधिकारी जळगाव यांनी सन १९८० व सन १९८३ साली उपरोक्त शेतजमीनीच्या संपादनास स्थगिती आदेश दिला होता. त्यानंतर जमीन मालकाने जळगाव येथील दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला, सदर जमीनीच्या भूसंपादनाअंतर्गत जमीन मालकास संधी देवून कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून जमीन अधिगृहीत करण्याबाबत मा. दिवाणी न्यायालय जळगाव यांनी दिवाणी दावा क्र. ६५५/१९८५ मध्ये दि. १५/१२/१९९८ रोजी निर्णय दिलेला आहे. मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे श्री. तंबाकूवाला यांनी रिट याचिका क्र.५३४/२००८ दाखल करून सदर रिट याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी वादी यांचा भूसंदर्भ दाखल करण्याचा अधिकार अबाधित ठेवून दावा मिळकतीचा ताबा घेण्यास कोणताही प्रतिबंध नाही.

असा आदेश दि.२५/८/२००९ रोजी पारीत केला.त्यानुसार दि. १६/१२/२०१३ रोजी विशेष भूसंपादन अधिकारी जळगाव यांनी प्रस्तुत प्रकरणी अंतीम निवाडा पारित केला. विशेष भूसंपादन अधिकारी यांनी प्रस्तुत जमीनीचा ताबा दि. १/९/२०१४ रोजी महामंडळाकडे दिला. त्यानंतर श्री.तंबाकूवाला यांनी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे अवार्ड रद्द करणे, त्रयस्थ पक्षकाराचा हितसंबंध निर्माण न करणे इत्यादी कारणास्तव भूसंपादन प्रक्रियेविरोधात रिट याचिका क्र. ७१३४/२०१४ दाखल केली. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाडयातील पंचतारांकित औद्योगिक वसाहत कृष्णूर एमआयडीसीतील पाइपलाईनेचे निकृष्ट काम झाल्याबाबत

**(५) ६३०२८ (२२-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील पंचतारांकित औद्योगिक वसाहत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कृष्णूर एमआयडीसीतील पाइपलाईनचे निकृष्ट काम झाल्यामुळे अनेक ठिकाणी पाईपलाईन फुटून लाखो लीटर पाणी वाया जात असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयासह नांदेड जिल्ह्यातही दुष्काळ पडलेला असून पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून कुण्णरुच्या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये पाण्याचा अपव्यय होत आहे हे लक्षात घेता शासन त्वरित आवश्यक कार्यवाही केली वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-११-२०१८) : (**१) खरे नाही. तथापि कृष्णूर औद्योगिक क्षेत्रासाठी शुध्द जल पुरवठा ही ५०० मी.मी. व्यासाच्या २८.०९ कि.मी. लांबीचा एम.एस. पाईपव्दारे केला जातो. या पाईपलाईनवर एअर वॉल्व, तसेच Expsandion joint बसवलेले असून काही वेळेस रस्त्यालगतच्या गावकऱ्याकडून या वॉल्व टॅम्पर करुन पाणी घेतले जाते, परंतू लगेच महामंडळाकडून हे बंद करण्यात येते.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खटाव (जि.सातारा) तालुक्यातील औंध, पुसेगाव, भोसरे, सिध्देश्वर, बुरोली, बुध परिसरातील बटाटा पीकाला हमी भाव देण्याबाबत**

**(६) ८२८३७ (१४-०४-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव तालुक्यातील (जि.सातारा) बटाटयाचे आगर म्हणून ओळखल्या जाणा-या औंध, पुसेगाव, भोसरे, सिध्देश्वर, बुरोली, बुध परिसरात खरीप हंगामातील बटाटयाचे दर कमी झाल्याने व उत्पादनात घट झाल्याने येथील शेतक-यांनी गुंतवणूक केलेल्या लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार शासनाने येथील बटाटा पीकाला हमी भाव देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-११-२०१८) :** (१) व (२) नाही,

वडूज कृषी उत्पन्न बाजार समिती, वडूज, ता. खटाव या बाजार समितीच्या क्षेत्रांतर्गत येणाऱ्या गावांमध्ये कांदा व बटाट्याचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. तथापि, शेतकरी बटाट्याची विक्री बाजार समितीमध्ये न करता इतरत्र ठिकाणी व थेट व्यापाऱ्याना करतात. खटाव तालुक्यातील बटाटा पिकांखालील क्षेत्र व उत्पादन पुढील प्रमाणे आहे:-

| सन | लागवडी खालील क्षेत्र(हेक्टर) | उत्पादन(मे.टन) |
|---|---|---|
| २०१४-१५ | १९३८.४३ | ३४८९१.७४ |
| २०१५-१६ | १८४६.३६ | ३३७०२.४८ |
| २०१६-१७ | २१४६.५१ | ३८६३७.१८ |
| २०१७-१८ | २२७८.८२ | ४१०१८.७६ |

(३) शेतमालाला हमीभाव केंद्रशासनामार्फत घोषित केले जातात. बटाटा हा नाशवंत शेतमाल असल्यामुळे, त्यासाठी हमी भाव घोषित केला जात नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य अपंग आर्थिक विकास महामंडळाकरीता जिल्हास्तरीय प्राधीकाऱ्यांची नामनियुक्तीद्वारे वा थेट पदस्थापना करण्याबाबत**

**(७) ९००६४ (१८-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य अपंग आर्थिक विकास महामंडळाकरीता व्यवस्थापकीय संचालक तथा अध्यक्ष आणि आवश्यकतेनुसार जिल्हास्तरीय प्राधीकाऱ्यांची नामनियुक्तीद्वारे वा थेट पदस्थापना करण्याची मागणी राष्ट्रीय अपंग विकास महासंघाच्या जिल्हाध्यक्ष तसेच कार्यध्यक्ष यांनी माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मंत्री(अपंग कल्याण), मा.मंत्री (उद्योग), मा.राज्यमंत्री (अपंग कल्याण) व प्रधान सचिव (अपंग कल्याण) आणि जिल्हा अपंग सहाय्यता अपंग कल्याण वित्तीय संस्था आणि मंडळाचे सक्षम प्राधिकारी यांच्याकडे माहे मे, २०१७ वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, माहे जून, २०१७ अखेरपर्यंत किती जिल्हा प्रशासनाकडून या संदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहे व त्यापैकी किती प्रस्तावास तत्वतः मंजुरी प्रत्यार्पित करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय अपंग विकास महासंघाच्या जिल्हाध्यक्ष तसेच कार्याध्यक्ष यांचे याबाबतचे निवेदन विभागास प्राप्त झालेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महामंडळे आणि समित्यांवर सदस्यांची नेमणूक न झाल्याने मागासवर्गीय घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना बंद झाल्याबाबत**

**(८) ९५३९२ (०६-०१-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महामंडळे आणि समित्यांवर सदस्यांची नेमणूक न झाल्याने मागासवर्गीय घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना गेल्या दिड वर्षापासून बंद असल्याची बाब माहे ऑक्टोबर २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंग वित्तीय विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, चर्मकार महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळांतील योजना पुन्हा सुरु करणेबाबत लोकप्रतिनिधींनी निवेदने देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळांवरील सदस्यांची नेमणूक करून योजना पुर्वव्रत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१३-११-२०१८) :** (१) व (२) लोकप्रतिनिधीची निवेदने प्राप्त झाली आहेत. तथापि, महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या राज्य महामंडळ योजना सुरु असून सदस्यांअभावी योजना बंद नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला(जि. अमरावती) येथे औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय सुरु करुन अधिकारी नियुक्त करण्याबाबत**

**(९) ९९४३३ (०३-०१-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील सर्वात जास्त उद्योगधंदे असलेल्या अकोल्यात औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय सुरु करण्यात यावे, अशी येथील उद्योजकांची गेल्या १० वर्षापासून मागणी आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील ११ जिल्हयांचा प्रभार गेल्या अनेक महिन्यापासून एकाच अधिकाऱ्याकडे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने येथील उद्योजकांची होणारी गैरसोय लक्षात घेत अकोला येथे कार्यालय सुरु करण्याबाबत कायमस्वरुपी अधिकाऱ्याची नियुक्त करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-११-२०१८) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

तथापि प्रादेशिक अधिकारी, अमरावती या पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रादेशिक अधिकारी, नागपूर यांचेकडून काढून अन्य अधिकाऱ्याकडे देण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रादेशिक अधिकारी, अमरावती या पदावर उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची त्वरीत नियुक्ती करण्याची विनंती महसूल व वन विभागास करण्यात आली आहे. तसेच अकोला येथे कार्यालय सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन नाही.

---

**मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळांनी दिलेले कर्ज माफ करण्याबाबत**

**(१०) १०२९१६ (०६-०१-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळांनी दिलेले कर्ज माफ करण्यात यावे अशी मागणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ बचाव समिती यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१३-११-२०१८) :**(१) होय. निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) कर्जमाफीचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रोहिदास महामंडळाकडून कर्ज प्रकरणे मंजूर करताना अटी शिथील करण्याबाबत**

**(११) १०४२९४ (१३-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोहिदास महामंडळाकडून लाभार्थ्यांना रुपये ३७,००० कर्ज दिले जाते या कर्जासाठी व्यावसायी रिक्षा, परमीट, टॅक्सबुक, आर.सी.बुक हे सर्व काही पत्रे बँकांकडे जमा करण्यात येऊनही सरकारी जामीन घेण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कर्ज प्रकरणे मंजूर करताना अनेक महिन्यांचा कालावधी जात असल्याने लाभार्थ्यांचे परमीट रद्द होत असल्याने रोहिदास महामंडळाकडून कर्ज प्रकरणांचा लाभ लाभार्थ्यांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करुन या योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मिळावा यासाठी उक्त अटी शिथील करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-११-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या विविध ४२ योजना निधी अभावी बंद पडल्याबाबत**

**(१२) १०६६०३ (२०-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास मंडळाच्या ,एकूण ४२ योजना निधी अभावी बंद पडल्या आहेत, हे खरे आहे काय?
(२)असल्यास, राज्यातील विविध जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांना सदर योजना सुरु करण्याबाबत निवेदन प्राप्त झाली आहेत, हेही खरे आहे काय,
(३)असल्यास, सदर योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-११-२०१८) :** (१) व (२) निवेदने प्राप्त झाली आहेत. तथापि, महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या राज्य महामंडळ योजना सुरु असून योजना बंद नाहीत.
(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यातील कृषिपंपांची देयके अवास्तव येत असल्याबाबत**

**(१३) ११०४८९ (०४-०४-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य विद्युत कायदा, २००३ नुसार ग्राहकांना मीटरद्वारे विद्युत पुरवठा करणे बंधनकारक असतानाही महावितरणने ३८ टक्के कृषीपंपाना अश्वशक्तीद्वारे जोडणी दिली तर ६२ टक्के कृषीपंपाना मीटरद्वारे वीज जोडणी दिल्यामुळे सरासरी व निश्चित अश्वशक्तीच्या आधारावर मोजमाप न करता ग्राहकांना अवास्तव वीज देयके दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्रात एकूण ४१,२१,८२८ कृषीपंप ग्राहक आहेत. त्यापैकी १५,०८,३८२ मीटर नसलेले व २६,१३,४४६ मीटर असलेले कृषीपंप ग्राहक आहेत. मा.विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेनुसार मीटर असलेल्या कृषीपंप ग्राहकांना वीज वापराप्रमाणे व मीटर नसलेल्या कृषीपंप ग्राहकांना अश्व शक्तीनुसार वीज देयकाची आकारणी करण्यात येते. विद्युत कायदा, २००३ अस्तित्वात आल्यानंतर सर्व कृषीपंप ग्राहकांची नवीन वीज जोडणी मीटरद्वारेच करण्यात येते.

महावितरणतर्फे ग्राहकांचा जो मंजूर जोडभार आहे, त्याप्रमाणेच वीज बिले दिली जातात. काही ठिकाणी तपासणीमध्ये अतिरिक्त जोडभार आढळून आल्यास तेथे जो वास्तविक जोडभार आहे, त्याप्रमाणे वीज बिले दिली जातात. चुकीच्या वीज बिलाच्या आकारणीबाबत प्राप्त तक्रारीचे महावितरमार्फत तातडीने निराकरण करण्यात येते. ६४ टक्के कृषी ग्राहकांना मीटर असल्यामुळे त्यांना मीटर वाचनाप्रमाणे वीज देयक आकारण्यात येते. त्यामुळे वीज पुरवठा बंद कालावधीतील देयकाची आकारणी केली जात नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सदोष वीज मीटर रीडींग घेणा-या खाजगी एजन्सीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत**

**(१४) १११५०८ (०४-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सदोष वीज मीटर रीडींग घेणा-या खाजगी एजन्सीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा सूचना महावितरणचे संचालक यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सूचनेनुसार कोल्हापूर जिल्हयात विभागाने अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१८) :** (१) प्रादेशिक संचालक, महावितरण कंपनी, पुणे यांच्या दिनांक १३.१०.२०१७ रोजीच्या सूचनेनुसार व वाणिज्य परिपत्रक क्र. ६७४९, दिनांक २९.०२.२०१६ अन्वये मीटर वाचन एजन्सीवर करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(२) चुकीचे मिटर रिडिंग घेणाऱ्या खाजगी एजन्सीवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. फौजदारी गुन्हे अद्यापपर्यंत दाखल झालेले नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे फाटा शिवार (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील ३०० टन उसाचे पीक शेतातून जाणा-या विद्वुत तारांमुळे जळून नष्ट झाल्याबाबत**

**(१५) १११५५९ (०४-०४-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे फाटा शिवार (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील गट क्र. ३० मधील ७७ आर, गट क्र. ३१,३२ मधील १ हे ५२ आर,७७ आर,४० आर,८० आर,३२ आर क्षेत्रातील ३०० टन ऊसाचे पीक शेतातून जाणा-या व विद्युत तारांमुळे जळून नष्ट झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकडे संबंधित कर्मचारी वा अधिकरी यांनी दुर्लक्ष केले असून याबाबत लोकप्रतिनिधी यांनीही दिनांक १३/१२/२०१७ रोजी मा. उर्जा मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी विभागाच्या कर्मचा-यांनी पंचनामा केला केला नाही व तो मंडळ अधिकारी, टेंभुर्णी यांनी केला असून विभागाच्या बेजबाबदार कर्मचा-यांवर योग्य कारवाई करण्याबाबत व संबंधित शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) वसमत ग्रामीण-१ शाखेतील महावितरणचे सहाय्यक अभियंता व विद्युत निरीक्षक, हिंगोली यांनी पंचनामा केला, परंतु विद्युत निरीक्षक यांनी आवश्यक असलेला कागदपत्रे सादर करण्यात विलंब केल्यामुळे महावितरणच्या जबाबदार अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे व कंपनीच्या नियमानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. संबंधित शेतकऱ्यांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जळगांव जिल्ह्यातील सावदा विभाग अंतर्गत महावितरणमार्फत १०० नवीन रोहित्र मिळण्याबाबत

**(१६) १११८९२ (०४-०४-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील सावदा विभागातंर्गत महावितरणमार्फत १०० नवीन रोहित्र मिळण्याबाबत चोपडा येथील लोकप्रतिनिधी यांनी दि.०३/१०/२०१७ रोजी मा.उर्जामंत्री यांचेकडे पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने नवीन रोहित्र उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सावदा विभागातील नादुरुस्त रोहित्रे बदलण्याकरिता दुरुस्त रोहित्रांचा पुरेसा साठा असावा व वीज ग्राहकांना अखंड वीज पुरवठा व्हावा या हेतूने सावदा विभागासाठी १०० के.व्ही.ए. क्षमतेचे एकूण ५० रोहित्राची मागणी करण्यात आली होती. सदर मागणीप्रमाणे महावितरणच्या मुख्य कार्यालयामार्फत दि.१२.१०.२०१७ रोजी १०० के.व्ही.ए. क्षमतेची २० रोहित्रे सावदा विभागास राखीव साठ्यातून उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच दि.०८.०६.२०१८ रोजी १०० के.व्ही.ए. क्षमतेची अतिरिक्त ५० रोहित्रे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. रोहित्र नादुरुस्त झाल्यानंतर वीज पुरवठा जास्त काळ खंडीत राहू नये म्हणून ते तातडीने दुसऱ्या दुरुस्त रोहित्राद्वारे बदलण्यात येते व नादुरुस्त रोहित्र त्वरीत दुरुस्त करण्यात येते. अशाप्रकारे सर्व क्षेत्रिय कार्यालयांकडे अतिरिक्त रोहित्रांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे सावदा विभागाकडे देखील अतिरिक्त रोहित्रांचा पुरेसा साठा उपलब्ध करुन दिला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शिवाजीनगर (ता.अंबड, जि.जालना) येथील दोन विद्युत तारांमध्ये घर्षण होऊन ऊस शेती नष्ट झाल्याबाबत

**(१७) ११२३०० (१९-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :**

सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर (ता.अंबड, जि.जालना) येथील श्री. तुकाराम आदमाणे यांचा ४ एकर ऊस व जाफ्राबाद तालुक्यातील कुंभारझरी येथील श्री. गुलाबराव चव्हाण यांच्या २ एकर ऊसाच्या क्षेत्राला महावितरण कंपनीच्या तारांमध्ये घर्षण होऊन शॉटसर्कीटमुळे लागलेल्या आगीत शेतक-यांचे नुकसान झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी असणा-या कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच सदर तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व कधीपर्यंत नुकसान भरपाई देण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, जालना यांनी चौकशी केली असून अहवालानुसार सदरचा अपघात वादळी वाऱ्यामुळे लघुदाब वाहिन्याच्या दोन तारांमध्ये घर्षण होऊन पडलेल्या ठिणग्यांमुळे झालेला आहे. संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी महावितरण कंपनीकडून दिनांक ११/१२ सप्टेंबर, २०१८ रोजी कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली व जळगांव जिल्हयातील शेतक-यांनी वीज कनेक्शनकरिता रितसर फी भरुनही वीज कनेक्शन न दिल्याबाबत**

**(१८) ११४००३ (१८-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेडग ( ता. मिरज, जि.सांगली) या गावातील भाऊसाो महादेव कोरे आणि जळगांव जिल्हयातील किसन सुखदेव कळसकर या दोन शेतक-यांनी वीज जोडणीकरिता सन २०१५ मध्ये रितसर फी भरुन तीन वर्षाचा कालावधी होऊनही वीज जोडणी न देता अनुक्रमे ५८९० रुपये आणि ७८०० रुपयांच्या थकबाकीच्या नोटीसा माहे डिसेंबर, २०१७ च्या सुमारास पाठविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२)तसेच महावितरणने कृषि पंपाचे मिटर रिडिंग घेण्यासाठी नेमलेले कंत्राटदार प्रत्यक्ष रिडिंग न घेता अधिका-यांच्या सूचनेनुसार अवास्तव रिडिंग लिहून बिले पाठवित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबधितांवर शासनाने कारवाई करण्याबाबत तसेच दोन शेतक-यांना वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

श्री.भाउसो महादेव कोरे या ग्राहकाने दिनांक १९.०१.२०१५ रोजी अनामत रक्कम रु.१५००/- भरणा करुन ३ एच.पी शेतीकरिता वीज कनेक्शनची मागणी केली होती. त्यानुसार ग्राहकास दिनांक ३०.०३.२०१६ रोजी नवीन वीज जोडणी देण्यात आली आहे. ग्राहकाकडे माहे जून, २०१७ अखेर रु.५८८५/- इतकी थकबाकी येणे असल्याने ग्राहकास सदर थकबाकी भरणा करणेसाठी दिनांक ०१.११.२०१७ रोजी नोटीस दिलेली होती.

तसेच जळगांव जिल्ह्यातील श्री.किसन सुखदेव कळसकर या ग्राहकाची माहिती संगणक प्रणाली विभागामधून तपासली असता (चालू वीज बिल ग्राहक यादी, अनामत रक्कम भरलेल्या ग्राहकांची यादी, कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत केलेल्या ग्राहकांची यादी) या नावाचा ग्राहक जळगांव जिल्ह्यामध्ये आढळून आलेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ता.रिसोड (जि.वाशिम) मौजा महागांव शिवारातील शेतक-याच्या द्राक्षबागेचे झालेले नुकसान**

**(१९) ११४०७३ (१८-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे महागांव शिवारातील (ता. रिसोड, जि.वाशिम) शेतकरी सुधाकर जिजेबा मवाळ यांच्या शेतातील गट नं. ५ या शेतातून पॉवरग्रीड कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. कंपनीचा सिंगल सर्कीट टॉवरचा पोल गेलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शॉर्टसर्किट होऊन शेतक-याची द्राक्षबागेचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपविभागीय अधिकारी रिसोड (जि.वाशिम) यांनी या शेतक-याला त्यांच्या द्राक्षबागेची नुकसान भरपाई सदर कंपनीने द्यावी असा दि.२७.१२.२०१६ रोजी निकाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मात्र कंपनी पोलिसांचा धाक दाखवून या शेतक-याला त्याच्या द्राक्षबागेची नुकसान भरपाई देण्याबाबत टाळाटाळ करीत असून यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर कंपनीकडून या शेतक-याला त्याच्या द्राक्षबागेच्या नुकसानीची भरपाई मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१८) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) विद्युत निरीक्षक, वाशीम कार्यालयाने दिनांक १२.०९.२०१८ रोजी चौकशी केली असून सदर चौकशीत श्री सुधाकर मावळ यांच्या शेतात पॉवर ग्रीड कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. कंपनीमार्फत सिंगल सर्किट वर्धा-औरंगाबाद १२०० के.व्ही. वाहिनीचा एक टॉवर असून त्याचे उभारणीचे काम सुरु होते. सदर वाहिनी अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे विद्युतभारीत नाही. तसेच श्री.मवाळ यांच्या शेतातून महावितरण किंवा इतर कुणा कंपनीची विद्युतभारीत वाहिनी गेलेली नाही. त्यामुळे शॉर्ट सर्किट होऊन श्री.मवाळ यांच्या शेतातील द्राक्ष बागेस नुकसान झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे नुकसान भरपाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आधारभूत दराने तूर खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणीबाबत**

**(२०) ११४५६८ (२३-०४-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाफेडमार्फत राज्यात १५९ खरेदी केंद्रांच्या माध्यमातून दिनांक १ फेब्रुवारीपासून आधारभूत दराने तूर खरेदीला सुरुवात करण्यात येणार असल्याचे मा.पणन व सहकार मंत्री यांनी जाहीर केल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खरेदी योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी नोंदणी आवश्यक असून त्यासाठी NELM पोर्टल सुरु करण्यात येऊन शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावर अथवा बाजार समिती आवारात जावे लागू नये म्हणून मंडळ स्तरावर अथवा मोठ्या गावामध्ये तुरीची नोंदणी करण्याचे शासनाने निश्चित केले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-११-२०१८) :** (१)होय.
(२) होय.
(३) तूर खरेदीसाठी NeML पोर्टलवर शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याने,खरेदी केंद्राच्या परिसरातील ५ ते ६ मोठ्या गावपातळीवर नोंदणी अभियान राबविण्याच्या सुचना जिल्हा पणन अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. या योजनेंतर्गत ग्रामसभेमध्ये प्रसिध्दी, नोंदणीसाठी विशेष शिबीर नियोजन व वर्तमानपत्रात प्रसिध्दी इ. बाबींचा समावेश आहे.

राज्यातील २५ जिल्ह्यामध्ये तूर खरेदीसाठी एकूण १९० खरेदी केंद्र सुरु करण्यात आली होती. दिनांक १८/५/२०१८ अखरेपर्यत राज्यामध्ये एकूण २,६५,४७० शेतकऱ्यांनी एकूण ३३,५३,८८४ क्विंटल तूर करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्हयात शेतक-यांच्या शेती पंपाची सुमारे ८० टक्याहून**
**अधिक देयके रिडींग न घेता दिल्याबाबत**

**(२१) ११५२२१ (१८-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयात शेती पंपाची सुमारे ८० टक्याहून अधिक देयके रिडींग न घेता दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांनी ६० रुपयांची वीज वापरली असेल तर त्यांना १०० रुपये वीजदेयके आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाने या वीजदेयकात योग्य बदल करुन देयके आकारावीत आणि संजीवनी योजनेतून ५० टक्के सवलत देऊन ती भरण्यास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

महावितरण मोबाईल ॲपद्वारे ग्राहकांचे रिडींग घेऊन रिडींग प्रमाणे वीज देयके आकारणी करण्यात येते.
(३) माहे ऑगस्ट, २०१८ अखेर सांगली जिल्ह्यातील ४८८७ कृषीपंप ग्राहकांच्या चुकीच्या देयका संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार एकूण ४८८७ ग्राहकांची देयके दुरुस्त करुन देण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा तांदूळवाडी, इसाद व राणीसावरगांव (ता.गंगाखेड, जि.परभणी ) येथील कृषी पंप वीज देयक व घरगुती वीज देयकाची वाढलेली थकबाकीबाबत**

**(२२) ११५७४६ (०४-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा तांदूळवाडी, इसाद व राणीसावरगांव (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथील कृषी पंप वीज देयक व घरगुती वीज देयकाची थकबाकी वाढल्याने शेतक-यांना त्यांची थकीत वीज देयके भरण्याची सक्ती करण्यात येवून सात दिवसात वीज देयके न भरल्यास त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येईल असा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, शेतक-यांनी वीज पुरवठा खंडीत करण्यात येऊ नये अशी मागणी मा.उर्जा मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतक-यांना व घरगुती ग्राहकांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :**(१) परभणी जिल्ह्यामध्ये एकूण ६५७९३ घरगुती , वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांनी मागील एक वर्षापासून एकाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही व १७६४९ घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांनी वीज पुरवठा घेतल्यापासून आजतागायत एकाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही.

कृषीपंपाचे थकीत वीज बिल न भरलेल्या ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत माहे ऑक्टोबर, २०१७ च्या अखेर सुरु करण्यात आलेली होती.

(२) हे खरे नाही.

(३) कृषी ग्राहकांना वीज देयकाच्या मूळ थकबाकीची रक्कम हप्त्याने भरण्याच्या सोयीसाठी शासनाने मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना, २०१७ दिनांक ३१.१०.२०१७ रोजी जाहीर केलेली आहे. तसेच घरगुती ग्राहकांचे वीज देयक दुरुस्ती करिता विविध ठिकाणी शिबीरे घेण्यात आलेली आहेत व चुकीचे वीज बिल दुरुस्त करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या मनमानी कारभारामुळे नागरिक त्रस्त झाल्याबाबत**

**(२३) ११९३९१ (२८-०७-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे महावितरण कंपनीच्या गैरकारभारामुळे नागरिक त्रस्त झाले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील श्रीमती जाकिया बानो मुश्ताक अहमद रा.नयापुरा (मालेगांव) यांची घरगुती जोडणी विना सुचना खंडीत केली गेली असुन हे वीज अधिनियम, २००३ चे कलम ५६ चे पोटकलम (२) प्रमाणे किमान १५ दिवस अगोदर विजपुरवठा खंडित करणेबाबतच्या सुचना देणे आवश्यक असतांनाही तसे न करता संबंधित विभाग विना सुचना विजपुरवठा खंडीत करीत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली तसेच महावितरण कंपनीच्या कारभारात सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

संबंधित ग्राहकाने माहे फेब्रुवारी, २०१७ नंतर वीज बिलाचा भरणा केलेला नाही. सदरील ग्राहकाची थकबाकी रु.२०,४६८/- एवढी असल्याने माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये ग्राहकाचा वीज पुरवठा, वीज अधिनियम, २००३ चे कलम ५६ प्रमाणे, नोटीस देऊन खंडीत केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विक्रमगड (जि.ठाणे) तालुक्यात लोंबकळत असलेल्या विद्युत वाहिन्या, गंजलेले विजेचे खांब, उघड्या तारा यामुळे नागरिकांच्या जिविताला धोका असल्याबाबत**

**(२४) १२०६९७ (२८-०७-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.ठाणे) तालुक्यात लोंबकळत असलेल्या विद्युत वाहिन्या, गंजलेले विजेचे खांब, उघड्या तारा यामुळे नागरिकांच्या जिविताला धोका असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच महावितरणाचे कार्यालय अनधिकृत इमारती मध्ये सुरु आहे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणाच्या या गैरकारभाराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने विविध योजनेअंतर्गत विक्रमगड तालुक्यातील लघुदाब वाहिनीचे व उच्चदाब वाहिनीचे एकूण २२३ गंजलेले विद्युत खांब बदली केले आहेत. तसेच लघुदाब वाहिनीच्या ५.५६५ किमी तर उच्चदाब वाहिनीच्या २.५ किमी जीर्ण झालेल्या वाहिन्या बदली करुन त्या ठिकाणी नवीन लघुदाब वाहिन्यांना सुमारे ३५६३ स्पेसर्स बसवून त्यांची दुरुस्ती केलेली आहे. संभाव्य धोकादायक वाटत असलेल्या लघुदाब व उच्चदाब वाहिन्यांना री-स्ट्रिगिंग व गार्डिंग करण्याचे काम झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जवळकी (ता.नांदगांव जि.नाशिक) येथे शॉटसर्किटमुळे झालेले नुकसान.**

**(२५) १२०७४२ (२८-०७-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (जि. नाशिक) तालुक्यातील भैय्या दादा पटेल, रा. जवळकी यांचे गट क्रमांक ७६ मध्ये दि. २८ एप्रिल, २०१७ रोजी विद्युत वाहिन्यांच्या घर्षणामुळे जनावरांचा चारा, शेती औजारे, ठिबक सिंचनाचे साहित्य नारळ व रामफळाची झाडे जळून सुमारे २,३३,०००/- रुपयांचे नुकसान झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीकडून अद्यापपर्यंत संबंधित शेतक-याला नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) नुकसान भरपाई संबंधीच्या आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता अद्यापपर्यंत पूर्ण केली नसल्यामुळे नुकसान भरपाई देण्यासंबंधीची कार्यवाही प्रलंबित आहे.
(३) नुकसानग्रस्त शेतकरी यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत दिनांक ०९.०८.२०१८ रोजी महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयाने कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कर्जत (जि.रायगड) येथे आदिवासी समाजासाठी आदिवासी भवन उभारणे बाबत

**(२६) १२०७८८ (२६-०७-२०१८). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) येथे आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात असून या समाजासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आदिवासी भवन उभारण्याबाबतची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी भवन उभारण्यासाठी शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा (१९-१०-२०१८) :**(१) माहे जुलै, २०१८ अखेर पर्यत आदिवासी भवन उभारण्याबाबत लोकप्रतिनिधींची मागणी प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलडाणा जिल्ह्यातील ग्राम विद्युत व्यवस्थापकांना कामांवर रुजू करुन घेण्याबाबत

**(२७) १२०९७१ (२८-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या ऊर्जा व ग्रामविकास विभागाने संयुक्तपणे एक गाव एक विदयुत व्यवस्थापक ही योजना हाती घेतली असून तीन हजारापर्यंत लोकसंख्येच्या गावात वीजपुरवठा व्यवस्थापनासाठी ग्रामविद्युत व्यवस्थापक नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलडाणा जिल्ह्यातील बहुतांश ग्राम विद्युत व्यवस्थापकांची ग्रामपंचायत मार्फत निवड होऊन तब्बल दीड वर्ष होऊन ७९ गावातील ग्राम विद्युत व्यावस्थापकांना कामावर रुजू करुन घेतले नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गावातील नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी विदयुत व्यवस्थापकांना कामांवर रुजू करुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडून निवड केलेल्या ६०६ ग्राम विद्युत व्यवस्थापकांची यादी दिनांक ०९.०७.२०१८ रोजी प्राप्त झाली. ग्राम विद्युत व्यवस्थापकांच्या नेमणुकीपूर्वी त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणे अनिवार्य असून प्रशिक्षण देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर प्रशिक्षणनानंतर ग्राम विद्युत व्यवस्थापकांना संबंधित ग्राम पंचायत अकरा महिन्याच्या कालावधीसाठी कार्यादेश देणेबाबत निर्णय घेईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**तालुका पवनी (जि.भंडारा) येथे कडधान्य खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत**

**(२८) १२०९७५ (२३-०७-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवनी (जि.भडांरा) तालुक्यातील तूर, चना, वाटणा व गहू पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात असून, सदर पिकाचे उत्पादन खरेदी करण्यासाठी कोणतीही शासकीय यंत्रणा कार्यान्वित नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे पिकांच्या खरेदीअभावी, शेतकऱ्यांना सोयीचे व सवलतीचे दर मिळावे, कडधान्य खरेदी केंद्र त्वरित सुरु करण्यात यावे यासाठी जिल्हा मार्केटिंग अधिकारी, मार्केटिंग फेडरेशन भंडारा व नाफेडद्वारे तातडीने सुरु होण्याच्या दृष्टीने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सहकार मंत्री यांना दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी कडधान्य खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-११-२०१८) :** (१) नाही.

कृषि विभागाच्या अहवालानुसार पवनी तालुक्यात गहू,वाटाणा व हरभरा(चना) पिकांखालील क्षेत्र नगण्य आहे.तसेच तुरीचे पीक भात पिकाच्या बांधावर घेतले जाते.

(२)होय..

(३)प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित आधिकाऱ्यांना खरेदी संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. भंडारा जिल्ह्यातील उत्पादित धान्याची प्रतवारी ही नाफेडच्या निकषाप्रमाणे नसल्याने खरेदी केंद्रांना स्थगिती देण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील शेतकऱ्यांनी महावितरण कंपनीकडे अनामत रक्कम भरुनही त्यांना केबलद्वारे वीजपुरवठा होत असल्याबाबत**

**(२९) १२१२९२ (२८-०७-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील अकोले, राजुर,बोटा या उपविभागामधील अंदाजे २००० शेतकऱ्यांनी 'महावितरण आपल्या दारी' या योजनेअंतर्गत महावितरण कंपनीकडे अनामत रक्कम भरुनही त्यांना केबलद्वारे वीजपुरवठा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, संबंधित अनामत रक्कम भरलेल्या शेतकऱ्यांना महावितरण कंपनीने वीजवाहक पोल उपलब्ध करुन सुरक्षित वीजपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील अकोले उपविभागात १५२४ व राजुर बोटा या उपविभागात २९८ असे एकूण१८२२ शेतकऱ्यांना "महावितरण आपल्या दारी" या योजनेअंतर्गत केबलद्वारे वीजपुरवठा करण्यात येत आहे.

(२)"महावितरण आपल्या दारी" या योजनेअंतर्गत विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या कृषीपंपांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक असून त्यासाठी महावितरण कंपनीमार्फत योजना प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रिधोरा (ता.सेनगांव, जि.हिंगोली) येथील खरेदी-विक्री संघात सोयाबीन खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(३०) १२१८६० (२६-०७-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिधोरा (ता.सेनगांव, जि.हिंगोली) येथील खरेदी -विक्री संघात शेतकरी श्री.शंकर झाडे यांच्या ३५ क्विंटल सोयाबीन खरेदीत गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या संघाच्या व्यवस्थापकांने सदर शेतकऱ्यांना स्वत:च्या वैयक्तिक खात्याचा धनादेश देऊन हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन सदर संघाच्या व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली आहे वा येत आहे,

(४) अदयाप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-११-२०१८) :**(१) नाही.

(२) नाही.

हिंगोली जिल्ह्यात हंगाम २०१७-१८ मध्ये तालुका खरेदी विक्री संघ,हिंगोली यांचेमार्फत नाफेडकडून पीएसएस योजनेंतर्गत एकूण २२१ शेतकऱ्यांकडून ४०३२.५०क्विंटल सोयाबीन खरेदी करण्यात आले आहे.सदर खरेदी करण्यात आलेले सोयाबीन वखार महामंडळाच्या गोदामात जमा करुन वखार पावत्या नाफेड कार्यालयास जमा करण्यात आल्या आहेत.खरेदीमध्ये श्री.शंकर झाडे व त्यांची पत्नी रा.रिघोरा यांचे ६४.५० क्विंटल, सोयाबीन खरेदीचे रेकॉर्ड तालुका खरेदी विक्री संघाकडून प्राप्त झाले आहे. त्यानुसार ऑनलाईन नोंदणी करुन श्री.शंकर झाडे व त्यांची पत्नी यांचे नावे रक्कम आरटीजीएसद्वारे ५३.२६ क्विंटल व यापुर्वी हिंगोली खरेदी विक्री संघाने दिलेल्या चेकद्वारे ११.३४ क्विंटल पुर्ण जमा रकमा करण्यात आलेली आहे.

(३ )हिंगोली तालुका खरेदी विक्री संघाने उपलब्ध केलेल्या रेकॉर्डनुसार ऑनलाईन नोंदणी केलेल्या सोयाबीनचे पुर्ण चुकारे अदा करण्यात आले आहे. तथापि,हिंगोली खरेदी संस्थेने खरेदीच्या कामामध्ये अनियमितता केल्याचे कारणाने संबंधित संस्थेचे खरेदीचे काम काढून घेण्यात आले असून पुढील खरेदीचे काम कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली यांच्याकडून पुर्ण करुन घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मरवडे (ता.मंगळवेढ़ा, जि.सोलापुर) गावातील शेतक-यांच्या कृषिपंपाना सुमारे ३ महिन्यांपासून कमी दाबाने विद्युतपुरवठा होत असल्याबाबत

**(३१) १२२१४३ (२८-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरवडे (ता. मंगळवेढ़ा, जि.सोलापुर) गावातील शेतक-यांच्या कृषिपंपाना सुमारे ३ महिन्यांपासून कमी दाबाने विद्युतपुरवठा होत असल्याने वीजेअभावी शेतक-यांची पिके धोक्यात आल्याचे माहे एप्रिल २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक शेतक-यांनी संबधित अधिका-यांकड़े अनेकदा तक्रारी देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर गावातील वीज पुरवठा सुरळीत होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

कृषी आवर्तनासाठी उजनी धरणामधून दिनांक ०९.०४.२०१८ रोजी कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आले होते व एकाच वेळेस सर्व कृषीपंपाचा भार आल्याने सदर भागात दिनांक ०९.०४.२०१८ ते २०.०४.२०१८ दरम्यान काही प्रमाणात कमी दाबाने वीज पुरवठा होत होता.
(२) हे खरे नाही.

दिनांक १९.०४.२०१८ रोजी मा. लोकप्रतिनिधी यांनी मंगळवेढा येथे स्थानिक शेतकरी व सर्व प्रशासकीय यंत्रणेची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये काही शेतकऱ्यांनी मौजे मरवडे गावांस कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याबाबत कळविले.
(३) मौजे मरवडे येथील नवीन शेतकऱ्यांना कायमस्वरुपी योग्य दाबाने वीज पुरवठा होण्यासाठी मौजे तळसंगी, ता. मंगळवेढा येथे नवीन ३३/११ के.व्ही उपकेंद्राचा प्रस्ताव पायाभूत सुविधा आराखडा-२ निधीतून प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यास अनुसरुन क्षेत्रीय कार्यालयास निविदा काढण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. ३३/११ के.व्ही तळसंगी उपकेंद्र स्थापन झाल्यानंतर मरवडे परिसरास योग्य दाबाने वीज पुरवठा होईल
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यातील वरठाण धरण परिसरात रोहित्राअभावी शेतक-यांची होत असलेली गैरसोय**

**(३२) १२२५७० (२८-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोयगाव तालुक्यातील (जि.औरंगाबाद) वरठाण धरण परिसरात दोन वर्षापासून मंजूर झालेले रोहित्र अद्यापही बसविण्यात आले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रोहित्राचे काम पूर्ण न झाल्याने शेतक-यांना वीजपुरवठा होत नसल्याने पिकांना पाणी देता येत नाही , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासानाने चौकशी करुन सदर ठिकाणी तातडीने रोहित्र बसवून वीजपुरवठा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८)** :(१) सोयगाव तालुक्यातील जिल्हा औरंगाबाद वरठाण धरण परिसरात गट क्र.१०३ येथे १०० केव्हीए क्षमतेच्या रोहित्राचा समावेश पायाभूत आराखडा-२ या योजनेअंतर्गत असून सदर रोहित्रांचे काम दि. १२.०८.२०१८ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही. सदर ठिकाणी १०० केव्हीए क्षमतेचे वॉटर सप्लाय रोहित्र असून त्याचा विद्युत पुरवठा चालू आहे. सद्यस्थितीत वॉटर सप्लाय/रोहित्रावरचा वीजभार कमी करण्यासाठी उपरोक्त नवीन १०० केव्हीए रोहित्र मंजूर केले आहे.

(३) पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत या नवीन रोहित्रांचे काम पूर्ण केल्यानंतर दिनांक १२.०८.२०१८ रोजी हे रोहित्र कार्यान्वित केल्यानंतर सदर ठिकाणचा विद्युत पुरवठा सुरु करण्यात आला.

(४) पायाभूत आराखडा-२योजनेअंतर्गत कन्नड विभागातील कंत्राटदाराने उपरोक्त रोहित्रांचे काम संथ गतीने केल्यामुळे सदर रोहित्र कार्यान्वित करण्याकरिता विलंब झाला. सदर कंत्राटदारास कामाची गती वाढविण्याकरिता पत्राद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या.

---

**पुणे जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक यांनी पदाचा गैरवापर केल्याबाबत**

**(३३) १२३००४ (२७-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक श्री.मोहन वर्दे यांनी पदाचा गैरवापर केला असून नीरा (जि.पुणे) येथील ज्युबिलीएंट लाईफ सायन्सेस प्रा.लि. या कंपनीचे परवानगी नसलेले मद्य विकण्यास परवानगी देऊन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त कंपनीत इथेनॉल, अल्कोहोल आणि ओ-२ या द्रव पदार्थांचे उत्पादन करण्यास बंदी असतानाही श्री.वर्दे यांच्या आदेशानुसार सदरहू पदार्थांचे अवैधपणे उत्पादन करत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच अवैध उत्पादन थांबविण्याण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. मे. ज्युबिलंट लाईफ सायन्सेस लि. निंबुत निरा, ता. पुरंदर, जि. पुणे नमुना आय व नमुना डिएस-१ या घटकास अतिशुद्ध मद्यार्क (Absolute Alcohol) मध्ये १% मिथेनॉल विपकृत मद्यार्क (Denatured Spirit) चा वापर करून तेलंगणा राज्यात ७५,००० ब.लि. निर्यातीकरिता नियमबाह्यपणे ३ निर्यात परवाने मंजूर केले आहेत.

(२) हे खरे नाही.

संबंधित घटकाकडे मंजूर केलेल्या एकूण ८ अनुज्ञप्त्या असून सन २०१७-१८ करिता त्यांचे नूतनीकरण केलेले आहे.

(३) भाग-१ बाबत या प्रकरणी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये श्री. वर्दे तत्कालीन अधीक्षक, राउशु, पुणे यांनी संबंधित घटकास मिथेनॉल विपकृत मद्यार्काच्या निर्यातीबाबतची नियमबाह्यपणे परवानगी दिलेली आहे असे निष्पन्न झाले आहे. याबाबत सविस्तर चौकशी करण्यात येत आहे.

भाग-२ बाबत- सदर घटक मे. ज्युबिलंट लाईफ सायन्सेस लि. निंबुत निरा, ता. पुरंदर, जि. पुणे यांनी राज्यात मद्यार्कात मिथेनॉल मिसळण्याची परवानगी नसताना मिथेनॉलची मिश्रित मद्यार्क परराज्यात निर्यात केले आहे. सदर गंभीर स्वरूपाची अनियमितता केल्याबाबत सदर घटकाविरूद्ध कार्यवाही सुरू आहे.

(४) श्री. वर्दे तत्कालीन अधीक्षक, राउशु, पुणे यांना दि.०६.०३.२०१८ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. घटकास मंजूर असलेली नमुना I व डिएस--१ अनुज्ञप्ती आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी दि.०३.०३.२०१८ च्या आदेशान्वये कायमस्वरूपी तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येउन त्यांचेविरूद्ध फौजदारी कारवाई करण्याचे आदेशित केले आहे. सदर आदेशाविरूद्ध उक्त घटकाने शासनास सादर केलेल्या अपीलाच्या अनुषंगाने आयुक्त, राउशु यांच्या दि.०३.०३.२०१८ च्या आदेशास अंतरिम स्थगिती देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य उत्पादन शुल्क कार्यालय भंडारा (जि.भंडारा) येथील अधिक्षक यांची सीबीआय मार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत**

**(३४) १२३०४७ (२७-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क कार्यालय भंडारा (जि.भंडारा) येथील अधिक्षक श्री.सुरेंद्र मनपिया यांच्या अधिकारात सन २०१२ ते २०१७ पर्यंत झालेल्या कामाची सीबीआय मार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबतची मागणी तेथील सामाजिक संघटनांनी माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास मा.राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) (२) व (३) होय. प्रस्तुत प्रकरणी चौकशीबाबतची कार्यवाही प्रक्रीयेत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयात कृषीपंपाना उच्च दाब वितरण प्रणालीव्दारे वीज पुरवठा करण्याबाबत**

**(३५) १२३४५२ (२८-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीजपुरवठयामध्ये वारंवार बिघाड निर्माण होऊन कृषिपंपाचा वीजपुरवठा कमी होणे, तांत्रिक वीजहानी होणे आदी समस्यांवर मात करण्यासाठी उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे कृषिपंप उर्जीकरण करण्याच्या योजनेस शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मे, २०१८ अखेरपर्यंत वाशिम जिल्हयातील किती शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे,

(३) अद्याप, या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत व वाशिम जिल्हयात कृषीपंपाना उच्च दाब वितरण प्रणालीव्दारे वीज पुरवठा करण्याच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :**(१) हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ०५.०५.२०१८ अन्वये कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे वीजजोडणी देण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली आहे.

(२) सदर योजनेअंतर्गत ६०४९ कृषीपंप अर्जदारांचा समावेश आहे.

(३) महावितरणच्या वाशिम मंडळ कार्यालयाने याबाबत २४ निविदा काढल्या असून त्याबाबतची पुढील प्रक्रिया सुरु आहे.

---

**लेंगरे (ता. खानापूर, जि. सांगली) येथे आगीमुळे डाळींब बागेचे झालेले नुकसान**

**(३६) १२३८७६ (२८-०७-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लेंगरे (ता. खानापूर, जि. सांगली) येथे दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागून ९ एकर डाळींब बागेचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, आग लागण्याची कारणे काय आहेत,

(३)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने नुकसानग्रस्त शेतक-यांना मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :**(१) हे खरे आहे.

(२) दिनांक ०१.०४.२०१८ रोजी मु.पो.लेंगरे, ता.खानापूर, जि.सांगली येथे ३३/११ के.व्ही लेंगरे उपकेंद्रामधून निघणाऱ्या ११ के.व्ही. लेंगरे ए.जी. फिडरवर १०० के.व्ही.ए. दबडे रोहित्राचा आर फेजचा इन्सुलेटर फुटल्याने स्पार्किंग होऊन ठिणग्या खाली असलेल्या वाळलेल्या गवतावर पडल्याने गवताने पेट घेतला व आग पसरत जाऊन जवळच असलेल्या श्री. दत्ताजीराव अमृतराव निंबाळकर यांच्या मालकीच्या डाळींब बागेला आग लागली.

(३) नुकसानग्रस्त शेतकऱ्याकडे नुकसान भरपाई प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची मागणी करण्यात आली असून सदर कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर महावितरण कंपनीच्या नियमानुसार नुकसान भरपाई देणेसंबंधीची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जळगाव जिल्हयात पैसे भरुनही कृषीपंप वीज जोडण्या प्रलंबित असल्याबाबत

**(३७) १२४०७६ (२८-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात पैसे भरुनही माहे जानेवारी, २०१८ अखेर ९६८८ कृषी पंप प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी पंप वीज जोडण्या देण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, वीज जोडण्या देण्यास हाेत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

जळगांव जिल्हयात सन २०१७-१८ मध्ये जानेवारी, २०१८ अखेर जळगांव जिल्हयात १०७७ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून जानेवारी, २०१८ अखेर ९६८८ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(२) राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या सुमारे २.२५ लाख कृषिपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणालीद्वारे (HVDS) वीजजोडणी देण्यासाठी नवीन योजना अंमलात आणण्यात आली असून सदर योजनेअंतर्गत जळगाव जिल्हयातील १०१८९ कृषीपंप ग्राहकांचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आष्टी, पाटोदा व शिरूर (जि. बीड) तालुक्यात ११ ठिकाणी नवीन ३३ के. व्ही.उपकेंद्रे सुरु करण्याबाबत

**(३८) १२४१०१ (२८-०७-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)आष्टी, पाटोदा व शिरूर (जि. बीड) तालुक्यात ११ ठिकाणी नवीन ३३ के. व्ही. उपकेंद्रे सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जनतेकडून शासनाकडे केली जात आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने या ठिकाणी पाहणी केली आहे काय, त्यानुसार या तालुक्यांतील ११ ठिकाणी नवीन ३३ के. व्ही. उपकेंद्रे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सदरहू मागणी केलेल्या ठिकाणी आष्टी तालुक्यात मौजे पांगरा येथे दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत काम प्रगतीपथावर आहे. HVDS योजनेअंतर्गत मौजे बेलगांव (किन्ही) व सावरगांव (ता.आष्टी), पांचग्री व पारगांव घुमरा (ता.पाटोदा), घाटशिळ पारगांव व गोमळवाडा (ता.शिरुर का) येथे ३३/११ के.व्ही चे उपकेंद्र प्रस्तावित केलेले आहे व तांत्रिक व्यवहार्यता तपासणी प्रक्रिया चालू आहे.
रुई व गहिनीनाथ गड (ता.आष्टी) जाटनांदूर (ता.शिरुर का) या ठिकाणी जवळचे उपकेंद्र कार्यरत असल्याने सदर ठिकाणी नवीन उपकेंद्र उभारणे तांत्रिकदृष्ट्या सुसाध्य नाही. तसेच भायाळा (ता.पाटोदा) येथे उपकेंद्र कार्यान्वित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंब्रा (जि.ठाणे) परिसरामध्ये वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत.**

**(३९) १२४५९१ (२८-०७-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंब्रा (जि.ठाणे) परिसरामध्ये वारंवार वीज खंडीत होत असल्याने येथील नागरिकांना त्रास होत असल्याने लोकप्रतिनिधींनी महावितरण कार्यालयावर मोर्चा काढून कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा दि. २७ मे, २०१८ रोजी वा त्या दरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत नागरिकांनी वारंवार कार्यकारी अभियंता, महावितरण, मुंब्रा विभाग यांचेकडे तक्रारी केल्या असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास. त्यानुसार शासनाने वीज पुरवठा सुरळीत होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-११-२०१८) :**(१) हे खरे नाही.

(२) सदर तक्रार महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेली नाही. परंतु मे, २०१८ मध्ये तापमान वाढल्याने तसेच रमजानच्या पवित्र महिन्यात अतिरिक्त रोषणाईमुळे केबल, केबलचे लग, फ्युज जळाल्याने, काही भागात वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रकार घडले होते. त्या ठिकाणी वेळेत वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.

(३) वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक साहित्य, जसे लघुदाब वाहिनीचे केबल, अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर यासह इतर लागणाऱ्या साहित्याचा साठा करुन आवश्यक ठिकाणी ठेवण्यात आला. तसेच वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी व वीज वाहिन्यांची देखभाल/दुरुस्ती त्वरीत करण्यासाठी कंत्राटदारामार्फत कुशल व अकुशल कामगार वाहनासह २४ तास काम करण्यासाठी तैनात करण्यात आले होते. वरील कामावर देखरेख ठेवून वेळेत दुरुस्तीचे काम होण्यासाठी अभियंत्याची नेमणूक देखील करण्यात आली होती. वरील उपाययोजना करुन वीज पुरवठा कमीत कमी वेळ खंडीत होईल याची दक्षता घेण्यात आली.

(४) सद्यस्थितीत वीज पुरवठा सुरळीत चालू आहे.

---

**भोकर (जि.नांदेड) येथील महावितरणच्या उपविभागीय कार्यालयात ग्राहकांनी भरणा केलेल्या वीज देयकाच्या रक्कमेत झालेला गैरव्यवहार**

**(४०) १२४६३६ (२६-०७-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) येथील महावितरणच्या उपविभागीय कार्यालयात ग्राहकांनी भरणा केलेल्या वीज देयकाच्या रक्कमेत गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ३० मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात नेमलेल्या विभागस्तरीय समितीने केलेल्या चौकशीत माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१८ या कालावधीत अदांजे २५ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीच्या अनुषंगाने शासनाने संबंधित दोषी अधिकारी वा कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-११-२०१८) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) चौकशीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीकडून संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचे निलंबन करण्यात आले आहे व याबाबतीत खात्यांतर्गत चौकशी चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नूल (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील कर्जाला कंटाळून तरुण शेतकऱ्यांने केलेली आत्महत्या**

**(४१) १२४७१६ (२८-०७-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नूल (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे सोसायटी, पतसंस्था व खाजगी सावकारीच्या कर्जाला कंटाळून सदाशिव रामा नंदनवाडे (वय ४२) या तरुण शेतकऱ्यांने दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, त्यानुसार मृत शेतकऱ्याच्या कुटूंबियास आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-११-२०१८) :** (१) नाही.
(२) शासनाने चौकशी केली असता मयत श्री.सदाशिव रामा नंदनवाडे यांचेकडून सहकारी पत संस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या अनुषंगाने कर्ज वसुलीबाबत त्रास होत असल्याची तसेच खाजगी सावकारी संदर्भात त्रास होत असल्याची तक्रार अथवा अर्ज शासनास प्राप्त झालेला नसल्याचे आढळून आले.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात आंद्र प्रदेश, तेलंगणा इत्यादी राज्यातून अवैध दारु मोठ्या प्रमाणात येत असल्याबाबत**

**(४२) १२४७८१ (२७-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात आंध्र प्रदेश, तेलंगणा इत्यादी राज्यातून अवैध दारु मोठ्या प्रमाणात येत असल्याचे माहे, मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्‌नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, अवैध दारुवर निर्बंध घालण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे. नांदेड जिल्हयातील आंध्रप्रदेश, तेलंगणा राज्यांच्या सीमेलगत असलेल्या तालुक्यात राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांतर्गत मार्च, २०१८ मध्ये अवैध ताडी व दारूविरूध्द विविध ठिकाणी एकूण २९ गुन्हे नोंदविले असून यामध्ये २७ गुन्हयामध्ये ताडी व २ गुन्हयामध्ये मद्य जप्त करण्यात आले आहे.

तसेच, या तालुक्यात पोलीस विभागामार्फत करण्यात आलेल्या कारवाई मध्ये महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांतर्गत एकूण ४८ गुन्हे दाखल करुन त्यामधील ५१ आरोपींविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांतर्गत एप्रिल २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत नांदेड जिल्हयात अवैध दारूची निर्मिती / विक्री / वाहतूक करणाऱ्याविरूध्द एकूण १६२७ गुन्हे नोंदविले असून त्यापैकी १११६ गुन्हे वारस आहेत. यामध्ये ११०७ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून ४८ वाहनांसह एकूण रु.७३.३६ लक्ष किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध धंद्यातील सराईत गुन्हेगाराकडून महाराष्ट्र दारुबंदी कायद्यातील कलम ९३ अन्वये चांगल्या वर्तणूकीचे बंधपत्र घेण्यात येते. नांदेड जिल्हयाच्या सीमावर परराज्यात जाणाऱ्या रस्त्यावर तात्पुरती तपासणी नाके उभारण्यात आलेली असून अचानक नाकाबंदी करून वाहनांची वेळोवेळी तपासणी करण्यात येते. अवैध मद्य विक्री, वाहतूक व निर्मितीविरूध्द पोलीस विभागाच्या समन्वयाने कारवाई करण्यात येते. जनतेच्या सहभागातून व ग्रामरक्षक दलाच्या माध्यमातून अवैध मद्य विक्रीच्या धंद्यावर नियंत्रण आणण्यात येत आहे. अवैध मद्य विक्री धंद्याविरूध्द तक्रारीसाठी आयुक्त कार्यालयात मध्यवर्ती नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात असून जनतेला टोल फ्री व व्हॉट्सप क्रमांक प्रसिध्द करण्यात आले आहेत.

त्याचबरोबर, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडुन दि. ३१.३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व पोलीस घटक प्रमुखांना राज्यातील अवैध दारु विक्री व निर्मितीचे धंद्यांवर कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**किनवट माहुर (जि.नांदेड) तालुक्यात मागील तीन वर्षात महावितरण विभाग, भोकर तर्फे झालेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(४३) १२५३०८ (२८-०७-२०१८). श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट-माहुर (जि.नांदेड) तालुक्यातील महावितरण विभाग, भोकर यांच्या मार्फत झालेल्या विद्युत खांब उभारणी, नवीन लाईन टाकणे, विद्यूत दुरुस्ती व इतर कामे निकृष्ट झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट झालेल्या कामांमुळे अल्प पाऊस व वाऱ्यामुळेही विद्युत पुरवठा खंडीत होऊन पून्हा विद्युत पुरवठा सुरु व्हायला दोन दिवस लागत असल्याने नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे तसेच निकृष्ट विद्युत खांब व तारा यांच्यामुळे जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार पुढे सदर भागातील निकृष्ट विद्युत खांब, तारा बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

किनवट/माहूर तालुक्यातील (जि.नांदेड) महावितरण विभाग, भोकर यांच्यामार्फत झालेल्या विद्युत खांब उभारणे, नवीन लाईन टाकणे, विद्युत दुरुस्तीची कामे कंपनीच्या नियमानुसार झालेली आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उच्च शिक्षणासाठी राखीव जागांवर प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्राशिवाय प्रवेश दिला जाऊ नये या शासननिर्णयाबाबत**

**(४४) १२५७७७ (२६-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च शिक्षणासाठी राखीव जागांवर प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची जात प्रमाणपत्रे बनावट असल्याचे गेल्या वर्षी निदर्शनास आल्याने जात पडताळणी प्रमाणपत्राशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाऊ नये असा निर्णय आदिवासी विभागाने घेतल्याचे माहे जून, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरण विधी व न्याय विभागाकडे मार्गदर्शनासाठी पाठविण्यात आले असून शासनाने त्यानुसार यावर कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला, नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (१९-११-२०१८) :** (१) व (२) होय. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र.२०२१०-२०२२४/२०१७ प्रकरणी दि.०६.०९.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन वैद्यकिय अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र

सादर करणे आवश्यक आहे. सबब, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्या विद्यार्थ्यांचा अनुसूचित जमातीचा दावा प्रकरण संबंधित तपासणी समितीकडे प्रलंबित आहे, अशा विद्यार्थ्यांना व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक प्रवेशाच्या अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास अडचणी होत असल्याची बाब विचारात घेऊन. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्यामुळे दि.२०.०६.२०१८ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये अधिनियम २०००  मध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता ज्या विद्यार्थ्यांचा मागास प्रवर्गाचा दावा प्रकरण संबंधित समितीकडे प्रलंबित आहे, अशा विद्यार्थ्यानी जात पडताळणी समितीकडे अर्ज केल्याचा पुरावा सादर करुन त्या आधारे विविध व्यवसायिक पाठयक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना परवानगी देण्याची आणि प्रवेश नियामक प्राधिकरणाने विर्निर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसुर केल्यास अशा विद्यार्थ्यानी राखीव प्रर्वगातुन मिळवलेला तात्पुरता प्रवेश रद्द झाल्याचे माननण्यात येईल, अशी तरतुद उक्त अधिनियम २००० मध्ये सुधारणा करण्यासाठी दि.२४.६.२०१८ रोजी अध्यादेश प्रसिध्द करण्यात आला. तदनंतर सन २०१८ च्या नागपूर येथील पावसाळी अधिवेशनामध्ये उक्त अधिनियम २००० मध्ये सुधारणा करण्याबाबतचे विधेयकास विधानमंडळाची मान्यता प्राप्त झाली असून विधेयकाचे मा.राज्यपाल महोदयांच्या मान्यतेने अधिनियमामध्ये रुपांतर झालेले आहे.

(३) लागु नाही.

---

**विचोरी (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील अनेक विदयुत खांब वादळी वारा व पावसामुळे पडल्यामुळे कृषी पंप विजपुरवठा खंडीत झाला असल्याबाबत**

**(४५) १२५८३१ (२८-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विचोरी (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील अनेक विदयुत खांब वादळी वारा व पावसामुळे पडल्यामुळे कृषी पंप विजपुरवठा खंडीत झाला असल्याने शेतक-यांचे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये  वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,  विदयुत खांब पुर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)  नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) मौजा विचोरी शिवारात वादळी वारा व पावसामुळे एकूण १० रोहित्रांवरील लघुदाब वाहिनीचे एकूण २९ पोल तुटल्यामुळे/वाकल्यामुळे एकूण ५८ कृषि ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत झाला होता. सदर लघुदाब वाहिनीचा नादुरुस्त भाग तातडीने वेगळा करुन तसेच देखभाल व दुरुस्ती करुन १० रोहित्रांवरील एकूण २९ कृषि ग्राहकांचा वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

महावितरण कंपनीच्या मोर्शी विभागीय कार्यालयाद्वारे ई-निविदा प्रसारित करुन पोल उभारणीच्या कामाचे कार्यादेश कंत्राटदारास देण्यात आले. विस्कळीत लघुदाब विद्युत वाहिनीची देखभाल, दुरुस्ती तसेच तुटलेल्या लघुदाब पोलची उभारणी करुन कृषि ग्राहकांचा वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**महाराष्ट्र राज्य अपंग वित्त विकास महामंडळ जि. अमरावती या कार्यालयाकडे सन २०१६ ते २०१७ या कालावधीत एकूण १०६ कर्ज प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) १२५८६१ (०४-०८-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त विकास महामंडळ ( जि. अमरावती) या कार्यालयाकडे सन २०१६ ते २०१७ या कालावधीत एकूण १०६ कर्ज प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी अमरावती जिल्ह्यातील ६७ आणि चांदुर बाजार तालुक्यातील ३९ प्रकरणे प्रलंबित असून अद्यापि मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत, हे हि खरे आहे काय ,
(३) असल्यास, सदर १०६ प्रकरणांना मंजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-११-२०१८) :** (१), (२) व (३) वित्तीय वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये अमरावती जिल्ह्यातून एकूण १०० कर्ज प्रस्ताव प्राप्त झाले. प्राप्त प्रस्तावातील परिपूर्ण कर्ज प्रस्ताव कर्ज मंजूर समितीसमोर सादर करण्यात आले असून त्यावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माणगांव (जि.रायगड) शहरातील वीज वितरण कंपनीतील मिटर गैरव्यवहाराबाबत.**

**(४७) १२५९७८ (२८-०७-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (जि.रायगड) शहरातील वीज वितरण कंपनीतील मीटर गैरव्यवहार उघडकीस आला असून माणगांव कचेरी रस्त्याच्या बाजूला असणा-या इमारत ईशरत प्लाझा या इमारतीमध्ये एकच मीटर दिला आहे व अनेक वर्षापासून रहिवाशी एकाच मीटरचा वापर करून वीजेचा वापर करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने संबंधीत दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) सदर जागेवर बांधकाम व्यावसायिकाने वाणिज्यिक दराने बांधकामासाठी दि.१७.०२.२०१७ रोजी तात्पुरत्या स्वरुपात वीज जोडणी घेतलेली आहे. सदर वीजजोडणी करिता मंजूर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील प्रस्तावित काम महावितरणच्या नियमाप्रमाणे पूर्ण केल्यानंतर इमारतीतील सदनिका धारकांना वीज जोडणी देण्यात येईल अशी तरतूद आहे. परंतु सदरचे काम बांधकाम व्यावसायिकाने आजतागायत पूर्ण केलेले नाही. तांत्रिक मंजुरीनुसार काम पूर्ण करण्यासाठी महावितरणच्या माणगांव उपविभागाकडून बांधकाम व्यावसायिकास पत्राद्वारे सूचित करण्यात आले होते. सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मराठवाडयातील अनूसूचित जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या पुनर्तपासणीस स्थगिती देण्याबाबत

**(४८) १२६१२७ (२७-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर)** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील अनुसूचित जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्राची विशेष तपासणी समितीकडून होत असलेली पुनर्तपासणी ही जात पडताळणी कायदा, २००१ च्या कलम ६ व ७ (२) चे उल्लंघन करणारी असल्याने जात वैधता प्रमाणपत्राच्या पुनर्तपासणीस स्थगिती देण्याची मागणी देगलूर-बिलोलीच्या लोकप्रतिनिधी यांनी मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावास मान्यता देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-११-२०१८)** :(१) होय.
(२), (३) व (४) नांदेडमध्ये विशेषत: औरंगाबाद विभागात नामसार्धम्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची जात प्रमाणपत्रे तसेच अवैध मार्गाने अनुसूचित जमातीची बनावट जात प्रमाणपत्रे व बनावट पडताळणीचे आदेश तयार करण्याच्या गंभिर तक्रारी प्राप्त झालेल्या

होत्या. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी देखिल औरंगाबाद विभागात नामसार्धम्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची जात प्रमाणपत्रे तसेच अवैध मार्गाने अनुसूचित जमातीची बनावट जात प्रमाणपत्रे व बनावट पडताळणीचे आदेश तयार केल्याची बाब तसेच संपुर्ण महाराष्ट्रात असा प्रकार करणारे रॅकेट सक्रीय असण्याची दाट शक्यता वर्तविली होती. यामुळे सदर तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ४९ व्या बैठकिमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार या प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी शासनाच्या दि.०१.०७.२०१६ च्या आदेशान्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपासणी समिती गठीत करण्यात आलेली असून सदर समितीचा अहवाल लवकरच प्राप्त होणे अपेक्षित आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ औरंगाबाद यांनी याचिका क्र.८८७५/२०१६ व क्र.११६०२/२०१७ मध्ये दि.२२.०१.२०१८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये विशेष तपासणीचे कामकाज योग्य असल्याचे मत व्यक्त केले आहे.

---

**धुळे येथील बियर शॉपीच्या नूतनीकरणासाठी लाच स्विकारताना राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय अधीक्षक व वरिष्ठ लिपिक यांना पकडण्यात अाल्याबाबत**

**(४९) १२६१८२ (२७-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील बियर शॉपीच्या नूतनीकरणासाठी लाच स्विकारताना राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय अधीक्षक व वरिष्ठ लिपिक यांना माहे मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास पकडण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरात कॉन्क्रीट रस्ते बांधाण्याची कामे घेतली असून त्या कामाचा वाढीव कालावधी पूर्ण होऊनही कामे अपूर्ण असल्याबत**

**(५०) १२६३०१ (२७-०७-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाजनकोच्या खापरखेडा व चंद्रपूर औष्णिक प्रकल्प कार्यालयाकडून अभि इंजिनियरिंग कार्पोरेशन प्रा.लि. ह्या कंपनीला बी.जी.आर.कंपनीच्या वतीने उपकंत्राटदार म्हणून काम केले असल्याचे अनुभव प्रमाणपत्र देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास अन्य किती कंपन्यांना उपकंत्राटदार म्हणून अनुभव प्रमाणपत्र देण्यात आले व मुख्य कंत्राटदाराने शासनाच्या परवानगीशिवाय नेमणूक केलेल्या उपकंत्राटदाराना अनुभव प्रमाणपत्र देण्याची तरतूद व कार्यपद्धती काय आहे,

(३) असल्यास, अश्याप्रकारच्या अनुभव प्रमाणपत्रांच्या आधारे अभी इंजिनियर कार्पोरेशन प्रा.ली.कंपनीने नागपूर शहरात कॉन्क्रीट रस्ते बांधण्याची कामे घेतली असून त्या कामाचा वाढीव कालावधी पूर्ण होऊनही कामे अपूर्णच आहेत, हे खर आहे काय,

(४) असल्यास, अशा नियमबाह्य पद्धतीने प्रमाणपत्र दिल्यामुळे निविदा प्रक्रियेतून अनुभवहीन कंत्राटदारांचा समावेश होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर असून वित्तहानी व जीवितहानी होण्याची शक्यता आहे तरी उक्त प्रकरणी शासनाचे चौकशी केली आहे , त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) महानिर्मिती औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्प उभारणीचे काम प्रतिबंधित क्षेत्रात होत असते महानिर्मिती व्यवस्थापनाला ज्ञात कंत्राटदार व कामगाराना सदर प्रतिबंधित क्षेत्रात काम करण्याची परवानगी देण्यात येते. महानिर्मितीच्या प्रकल्पामध्ये काम करण्यासाठी मुख्य कंत्राटदाराने नेमणूक केलेल्या उपकंत्राटदारांना अनुभव प्रमाणपत्र देण्याची तरतूद व कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे.

तरतूद : कंत्राटाच्या करारामध्ये कामाचे प्रगतीपत्र व अंतिम प्रमाणपत्र देण्यासंबंधीची तरतूद नमूद असते. त्यानुसार कंत्राटदाराने कंत्राटाच्या अटीप्रमाणे पुराव्यानिशी अर्ज करावा व सदर अर्जाची तपासणी करुन अभियंत्याने कामाचे प्रमाणपत्र द्यावे.

कार्यपध्दती :- उपकंत्राटदाराने मुख्य कंत्राटदारामार्फत केलेल्या कामाच्या तपशिलासह अर्ज सादर करावा. मुख्य कंत्राटदाराने सदर कामाची खात्री करुन मुख्य कंत्राटदाराच्या वतीने काम केल्याचे प्रमाणपत्र उपकंत्राटदार यांना देण्याचा विनंती अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे सादर करावा. सक्षम अधिकारी (अभियंता) यांनी सदर कामाची तपासणी करुन महानिर्मिती कंपनीच्या पत्र क्र. ED (O & M)/works/All TPS/०६४४९ dtd.१०.०७.२०१८ अन्वये निर्गमित मार्गदर्शक सूचनांनुसार खालील अटींची पूर्तता झाल्याची खात्री करुन प्रमाणपत्र द्यावे.

१ मान्यताप्राप्त उपकंत्राटदार यांने महानिर्मितीकडून पुष्टीकरण /सहमती.

२ ईपीसी/टर्नकी/बीओटी/कंत्राटदाराकडून कामाचे कार्यादेश असावे.

३ कार्यादेश यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे कंत्राटदाराचे प्रमाणपत्र असावे.

(३) व (४) नागपूर महानगरपालिकेकडून प्राप्त माहितीनुसार, मे. अभि इंजिनिअरींग कॉर्पोरेशन प्रा.लि. यांना शहरातील सिमेंट काँक्रीट रस्ते प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत पॅकेज क्र. १ व २ चे कार्यारंभ आदेश दिले असून या कामाकरिता वाढीव मुदत दिनांक ३१.१२.२०१८ पर्यंत देण्यात आली असून सदरची कामे प्रगती पथावर आहेत. मे. अभि इंजिनिअरींग कॉर्पोरेशन प्रा.लि. यांनी सादर केलेली अनुभवाची प्रमाणपत्रे नियमानुसार योग्य असल्याची शहानिशा महानिर्मिती कपंनीकडून करण्यात आल्यानंतरच नागपूर महानगरपालिकेकडून निविदा मान्य करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.